# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## (एकमेव मान्यता युनियन)

दिनांक 07.04.2017

मित्र हो,

ओएनजीसी, मुंबई येथील प्रकल्पामध्ये विविध पदांच्या भरतीसाठी दिनांक 2.2.2017 रोजी जाहीरात देण्यात आली. त्याच दरम्यान चेन्नई येथे सुध्दा भरतीसाठी जाहिरात देण्यात आली होती. परंतु दोन्ही जाहीरातीत एक अत्यंत महत्वाचा बदल ओएनजीसी व्यवस्थानाकडून करण्यात आला. चेन्नई येथील जाहीरातीत तामीळनाडु राज्यातील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या नोदणींची अट ठेऊन मुंबई येथील जाहीरातीतून एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या नोंदणीची अट काढून टाकण्यात आली होती. याचा अर्थ असा कि चेन्नई येथील जाहीरातीप्रमाणे फक्त तामीळनाडू राज्यातील उमेदवारच अर्ज करु शकत होते आणि या उलट मुंबईच्या जाहीरातीतून अट काढल्यामुळे संपूर्ण भारतातील उमेदवार अर्ज करु शकत होते. तामीळनाडूच्या अटीमुळे महाराष्ट्रातील उमेदवार चेन्नईच्या पदासाठी अर्ज करु शकले नाहीत. परंतु मुंबई जाहीरातीतून अट काढल्यामुळे तामीळनाडूच्या उमेदवारांनी मात्र नक्कीच अर्ज केले असणार.

एकाच कंपनीतील जाहीरातीतील हि विसंगती नक्कीच अन्यायकारक होती कारण महाराष्ट्रातील भुमिपुत्रांचा हक्क यामुळे डावलला जाणार होता. आज स्थानिय लोकाधिकार समितीच्या स्थापनेपासुन म्हणजेच 1982 सालापासुन महाराष्ट्रातील भुमिपुत्रांच्या भरतीसाठी समिती क्रियाशील राहीली. त्यामुळेच ओएनजीसी मुंबई प्रकल्पातील मराठी टक्का आबाधित राहिला याबद्दल कोणाचेही दुमत नाही.

व्यवस्थापनाच्या या अन्याया विरोधात आपण दिनांक 2.2.2017 रोजी प्रथम पत्र दिले परंतु या पत्राची व्यवस्थापनाकडून दखल न घेतल्यामुळे पुन्हा दिनांक 22.3.2017 रोजी आंदोलन कार्यक्रम जाहीर करुन दुसरे पत्र ओएनजीसी व्यवस्थापनास देण्यात आले. स्थानिय लोकाधिकार समिती व कर्मचारी संघटनेतर्फे व्यववस्थापनाने केलेल्या चुकीबद्दल देहरादून मुख्यालयाशी भुमिपुत्रांच्या हक्कासाठी सातत्याने संपर्क करण्यात आला. त्याचप्रमाणे मा. खासदार श्री गजानन किर्तीकर व मा. खासदार श्री अनिल देसाई यांनाही हया अन्यायाबद्दल सविस्तर माहीती देण्यात आली. मुंबईच्या या भरती संदर्भात आम्हांस चर्चा करावयाची आहे असा निरोप ओएनजीसीचे चेअरमन, डायरेक्टर (ऑफशोअर), डायरेक्टर (एचआर) यांना या खासदारांतर्फे देण्यात आला.

या सर्व कारवाईचा योग्य तो परिणाम होऊन दि. 2 एप्रिल, 2017 रोजी घेण्यात येणा-या लेखी परीक्षेला तातडीने स्थगिती देण्यात आली. या भरती संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी ओएनजीसीच्या सर्व प्रकल्पातील मान्यताप्राप्त युनियनच्या सरचिटणीसाची बैठक देहरादून येथे दिनांक 12.4.2017 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

ही भरती ऑल इंडियाला करण्याचे कारण सुप्रिम कोर्टाचा निर्णय असल्याचे ओएनजीसी व्यवस्थापन सांगत होते मग हा निर्णय चेन्नईला का लागू नाही या प्रश्नाचे उत्तर व्यवस्थापनाकडे नव्हते. यापूर्वी आसाम मध्ये झालेल्या भरतीत मुंबईच्या डिपार्टमेंटल उमेदवारांना मारहाण झाली होती. (संदर्भ पत्र क्.ONGC/KS/281 दिनांक 10.6.2015) त्याचप्रमाणे आसाम मध्ये परिक्षा देण्यासाठी आलेल्या आगरतलाच्या उमेदवारांना देखील हॉटेलमध्ये बंद करुन त्यांचे मोबाईल काढून घेण्यात आले व परिक्षा संपल्यानंतर त्यांना रेल्वेस्टेशनवर सोडण्यात आले होते. या अन्यायासंदर्भात कर्मचारी संघटनेनेच अतिशय कडक शब्दात

..2..

व्यवस्थापनाला समज दिली होती व अशाप्रकारे परप्रांतिया विरुध्द याहीपेक्षा उग्र आंदोलन आम्ही मुंबई मध्ये करु शकतो याची जाणीव करुन दिली होती. आता सुध्दा आसाम मध्ये सर्व भारतातल्या उमेदवारांना बोलावून ओएनजीसी लेखी परीक्षा घेऊ शकत नाही कारण आसाम मध्ये भुमिपुत्रांसाठी नक्कीच मोठे आंदोलन केले जाईल व कायदा व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल. याची मॅनेजमेंटला पूर्ण पणे जाणीव आहे.

आता देहरादून येथे होणा-या बैठकीमध्ये स्थानिय लोकाधिकार समिती व कर्मचारी संघटने तर्फे एम्प्लॉयमेंट एक्सचेंजची अट कायम ठेवण्यासाठी आग्रह धरण्यात येईल जेणेकरुन महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांना नोक-या मिळतील. संपूर्ण भारतभरातून मुंबईतील भरतीत बाहेरील उमेदवार आल्यावर ओएनजीसीमध्ये गेले 17 ते 18 वर्षे टेन्युअर बेसवर काम करणा-या आपल्या कर्मचा-यांना नियमित होण्यासाठी संधीच मिळणार नाही.

आज आपल्या सर्वांच्या भक्कम पाठींब्यामुळे व मा. खासदार श्री गजानन किर्तीकर व श्री अनिल देसाई यांच्या आक्रमक व खंबीर भुमिकेमुळे व्यवस्थापनाला या अन्यायकारक भरतीला स्थगिती द्यावी लागली. आपल्या सर्व कर्मचा-यांच्या भक्कम एकजुटीचा हा ख-या अर्थाने विजय आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

येथे एका गोष्टीची आपणां सर्वाना गंभीरपणे दखल घ्यावी लागेल. मराठी भाषिकावर होणा-या अन्यायाविरुध्द आम्ही लढत असतांना काही मंडळी कुंपणावर बसुन मजा बघत होते. त्यांना तर असे वाटत होते की स्थानिय लोकाधिकार समिती व कर्मचारी संघटना ही भरती थांबवूच शकणार नाही **परंतु चुकीच्या मार्गाने दुस-यांचे हक्क लुबाडणा-यांजवळ असा आत्मविश्वास असुच शकत नाही कारण ओएनजीसी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करण्याची हिम्मत व आत्मविश्वास ते केव्हाच हरवून बसले आहेत**.

MOU-2004 संदर्भात सुध्दा यांच्या सहयोगी युनियन योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत म्हणून MOU-2004 मध्ये सुधारणा घडवून आणण्यास उशीर होत आहे परंतु आमच्या विरोधकांनी पक्के लक्षत ठेवावे MOU-2004 मध्ये सुधारण केल्याशिवाय नवीन R&P होऊच शकत नाही आणि जो पर्यंत या MOU त सुधारणा होत नाही तो पर्यंत कर्मचारी संघटना नवीन R&P होऊ देणार नाही.

नेतृत्वावरचा अतुट विश्वास आणि कर्मचारी संघटनेच्या सभासदांचा भक्कम पाठींबा यामुळेच आपण आजपर्यंत सर्व आंदोलने यशस्वी केलेली आहेत.

यापुढील आंदोलन आपले MOU-2004 मध्ये सुधारणा व उत्तम प्रतिच्या सुरक्षा साधनांसाठी असेल म्हणजेच ऑफशोअर व उरण प्लांट, न्हावा येथील कर्मचा-यांना डांग-या, हेल्मेट, हॅन्ड ग्लोवज इत्यादी साहीत्य उत्तम प्रतिचेच मिळाले पाहीजे. नुकत्याच नवीन देण्यात आलेल्या डांग-यासुध्दा आटत असल्याची तक्रार आहे.

तरी आपणा सर्वाना आवाहन करण्यात येत आहे कि पुढील आंदोलनासाठी सज्ज रहा. MOU - 2004 मध्ये सुधारणा व उत्तम प्रतिची सुरक्षा साधनं आपण मिळविल्या शिवाय रहाणार नाही.

**कामगार एकता झिंदाबाद! कर्मचारी संघटना झिंदाबाद!!**

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**